| MHSN060016232022 | **नियमित दिवाणी दावा : २३७/२०२२**<br>श्री. आण्णाप्पासिंग करणसिंग रजपूत<br>विरुध्द<br>श्री. सज्जनसिंग करणसिंग रजपूत |
|---|---|

## निशाणी १८ खालील आदेश

१. प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जाद्वारे त्यांचे विरुध्द झालेला विना कैफीयत चा आदेश रद्द होवून त्यांची कैफीयत अभिलेखावर घेणेकामी विनंती केली आहे. त्यामध्ये त्यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे वयस्कर असल्यामुळे ते सतत आजारी असतात. तसेच त्यांची नुकतीच डोळयाची शस्त्रक्रिया झाली आहे. तसेच त्यांना कायदयाचे ज्ञान नसल्यामुळे विहीत वेळेत वकीलांशी भेटून आवश्यक ती कागदपत्रे व माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द विना कैफीयत चा आदेश पारीत झालेला आहे. तरी सदरचा आदेश रदद करुन त्यांची कैफीयत रेकॉर्डसदरी घेणेकामी त्यांनी विनंती केली आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जास नि.१९ कडे त्यांचे म्हणणे देवून अर्जास सक्त विरोध केला आहे. त्यामध्ये त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे देणेसाठी मुदत देणेत आली होती. परंतु त्यांनी त्यांचे म्हणणे वेळेत दाखल न केल्यामुळे दि.२७/०१/२०२३ रोजी त्यांचे विरुध्द विना कैफीयत चा आदेश पारीत झालेला आहे. तसेच प्रतिवादीने अर्जात नमूद केलेले कारण हे खोटे व चुकीचे असून त्यांना मान्य नाही. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे. तसेच मे. न्यायालय प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेच्या न्यायाप्रत आलेस प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करावा अशी त्यांनी विनंती केली.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे, प्रकरणाचे व दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी यांना दि. ०३/१०/२०२२ रोजी समन्स लागल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रस्तुत

प्रतिवादी हे दिनांक ०७/१०/२०२२ रोजी वकीलांमार्फत हजर झाल्याचे दिसून येते. तसेच त्यांना कैफीयत दाखल करणेस जवळपास सहा महिन्यांचा विलंब झाल्याचे दिसून येत आहे. परंतु, सदरचा विलंब हा त्यांना विहीत वेळेत वकीलांशी भेटून आवश्यक ती कागदपत्रे व माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे झाल्याचे दिसून येते. परंतु, नैसर्गिक न्यायतत्वाच्या अनुषंगाने प्रतिवादी विरुध्द झालेला विना कैफीयतचा आदेश रद्द करुन दावेस त्यांना त्यांची कैफीयत व म्हणणे दाखल करण्याची संधी देणे हे न्यायाच्या हेतूने योग्य होणार आहे. तसेच प्रस्तुतचा दावा हा वादीने वसुलीकरिता दाखल केला आहे. त्यामुळे दाव्याचा निकाल हा गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादीचा सदरचा अर्ज मंजूर करणे हे न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. परंतु प्रतिवादी यांना कैफियत दाखल करणेकरीता झालेला विलंबही विचारात घ्यावा लागेल. यावरुन एकंदरीत सर्व बाजूंचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी रक्कम रु.५००/- (पाचशे रुपये मात्र) वादींना द्यावेत.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा खर्च वादीस न दिल्यास तो दावा खर्चात समाविष्ट करुन घेणेत यावा.

४. प्रतिवादी यांची कैफियत व म्हणणे आज रोजी वाचून दाखल करणेत येते.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2023.07.12 05:00:26 +05'30'

मिरज — **(नि. बा. चव्हाण)**

दिनांक : १२/०७/२०२३ — ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

मिरज

## CERTIFICATE

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Sou. A.C. Patil, (Grade-III) |
| Court | : | $4^{th}$ Jt. Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Miraj |
| Date | : | 12/07/2023 |
| Order signed by the Presiding Officer | : | 12/07/2023 |
| Order uploaded on | : | 12/07/2023 |